नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १७६ Issue - 176 | वार बुधवार दि. १३ नोव्हेंबर २०२४ Blow- Wednesday Date 13 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

थोडक्यात

लातूरमध्ये नितीन गडकरींचीही तपासणी; हेलिकॉप्टर तपासणीचा व्हिडीओ आला समोर

लातूर : शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते उद्धव ठाकरे वणी आणि धाराशिव येथे सभा घेण्यासाठी गेले असताना त्यांची दोन वेळा बॅग तपासणी करण्यात आली. या तपासणीचा व्हिडीओ चित्रीत करून उद्धव ठाकरे यांनी व्हायरल केला. त्यामुळे या विषयावर बराच गदारोळ झाला. यानंतर आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी केली असल्याची माहिती समोर आली आहे. लातूर जिल्ह्यात मंगळवारी सभा घेण्यासाठी आले असताना नितीन गडकरी यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी करण्यात आली. नितीन गडकरींच्या हेलिकॉप्टर तपासणीचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. काल धाराशिव जिल्ह्यात जाहीर सभेसाठी गेले असताना उद्धव ठाकरेंची दुसऱ्यांदा बॅग तपासण्यात आली. निवडणूक आयोगाने यंदा कडक उपाययोजना राबविल्यामुळे अनेक नेत्यांची तपासणी करण्यात येत आहे. दरम्यान उद्धव ठाकरे यांनी मात्र या तपासणीवर आक्षेप घेतला. फक्त विरोधी पक्षातील नेत्यांच्याच बॅग तपासल्या जात आहेत.

सत्ताधारी नेत्यांच्या बॅगा कधी तपासणार? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. मतदारांना भेटवस्तू, पैसे किंवा इतर आमिषे दाखविल जाऊ नयेत, यासाठी निवडणूक आयोगाकडून आचार संहितेच्या काळात तपासणी केली जात असते.

ग्राऊक महागाई दराने गाठला १४ महिन्यांचा उच्चांक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : रिझर्व्ह बँकेच्या अनेक प्रयत्नांनंतरही देशात महागाई सातत्याने वाढते आहे. ऑक्टोबर महिन्यात घाऊक महागाई दर ६.२१ टक्क्यांवर पोहोचला आहे. गेल्या महिन्यात हा दर ५.५ टक्के होता. मात्र, या महिन्यात महागाईने मागच्या १४ महिन्यातील उच्चांक गाठला आहे. यामुळे खाद्यपदार्थ, विशेषत: भाज्या आणि उत्पादित खाद्य वस्तूंच्या किमतीही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. ज्याचा फटका आता सर्वसामान्यांना बसण्याची शक्यता आहे.

देशात महागाईत सातत्याने वाढ

राष्ट्रीय सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार, उत्पादित खाद्य वस्तूंचा महागाई दर ९.६९ टक्क्यांवर पोहोचला आहे, जो सप्टेंबर महिन्यात ८.३६ नोंदवला गेला. तर भाज्यांचा महागाई दर ४२.१८ टक्क्यांवर वर पोहोचला आहे. हा दर सप्टेंबर महिन्यात ३५.९९ टक्के नोंदवण्यात आला. याशिवाय फळांचा महागाई दरही वाढला आहे. जो सप्टेंबर महिन्यातील ७.६५ टक्क्यांहून ८.४३ टक्क्यांवर पोहोचला आहे. याशिवाय कडधान्यांच्या महागाई दरातही किंचीत वाढ बघायला मिळाली आहे. सप्टेंबर महिन्यातील ६.८४ टक्क्यांच्या तुलनेत ऑक्टोबर महिन्यात हा दर ६.९४ टक्के नोंदवण्यात आला आहे. तसेच मास आणि माशांचा महागाई दरातही २.६६ टक्क्यांवरून ३.१७ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. खाद्यतेलाच्या किंमतीही वाढल्या आहेत. महत्त्वाच्या म्हणजे घरांच्या महागाईचा दरही सप्टेंबरमधील २.७८ टक्क्यांवरून ऑक्टोबरमध्ये २.८१ टक्क्यांवर पोहोचला आहे.

भाजीपाला आणि खाद्य तेलाच्या दरांत मोठी वाढ होणं हा चिंतेचा विषय आहे. देशाच्या काही भागात अवकाळी पावसामुळे नुकसान झालं आहे. त्यामुळे भाजीपाल्यांचे भाव वाढले आहेत. याशिवाय आयात शुल्कात वाढ झाल्याने खाद्यतेलाच्या किमतीही वाढल्या आहेत. या किंमती सरकारने स्थिर ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे अशी प्रतिक्रिया अर्थतज्ज्ञ रजनी सिन्हा यांनी दिली.

महत्त्वाचे म्हणजे दीड वर्षांत महागाईचा दराने विक्रमी उच्चांक गाठल्याने डिसेंबरमध्ये होणाऱ्या चलनविषयक धोरणांच्या बैठकीत (एमपीसी) रेपो दर जैसे थे राहील अशी अपेक्षा व्यक्त केली जाते आहे. गेल्या काही बैठकांपासून रेपो दर ६.५ टक्क्यांवर कायम आहे. अशातच आता डिसेंबरमध्ये होणाऱ्या बैठकीत यात कोणता बदल सगळ्याचे लक्ष लागले आहे.

पंतप्रधानांना संविधानाची जाणच नाही; राहुल गांधी यांची टीका

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

गोंदिया : नरेंद्र मोदी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे २४ तास केवळ संविधानावर हल्ला करण्याचा प्रयत्न करीत असतात. हा हल्ला ते समोरून नव्हे तर बंद दारातून करतात. मोदी म्हणतात, आमच्याकडचे संविधान लाल रंगाचा आहे. मग त्यांनी सांगावे, या संविधानात फुले, आंबेडकर, भगवान बुद्ध यांचे विचार नाहीत का? माझ्या मते मोदींना संविधानाची जाणच नाही, त्यांनी संविधानाचे वाचनच केले नाही. वाचन केले असते तर संविधानाचे महत्त्व त्यांना कळले असते, अशी टीका विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली.

मंगळवारी गोंदिया येथे महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. मोदींनी देशात तीन काळे कृषी कायदे आणले होते. त्याविरोधात संपूर्ण देशातील शेतकरी रस्त्यावर उतरले तरीदेखील मोदी म्हणतात हे कायदे शेतकरी हिताचे आहेत. हे सरकार अंबानी आणि अदानीचे असल्याची टीकाही राहुल यांनी या वेळी केली.

विमानातील तांत्रिक बिघाडामुळे काँग्रेस नेते राहुल गांधी यांची जिल्ह्यातील चिखली येथील प्रचार सभा रद्द करण्यात आली. मंगळवारी दुपारी १२ वाजता त्यांची चिखलीचे काँग्रेस उमेदवार राहुल बोंद्रे आणि खामगावचे उमेदवार राणा दिलीप सानंदा यांच्या प्रचारार्थ सभा आयोजित होती. मात्र, त्यांना घेऊन येणाऱ्या विमानात तांत्रिक बिघाड झाला. यामुळे ते चिखलीत येऊ शकले नाहीत. त्यांनी स्वत: चित्रफीत प्रसारित करून याबद्दल जनतेची माफी मागितली. राहुल गांधी १४ नोव्हेंबर रोजी नंदूरबार आणि नांदेड येथे, तर १६ नोव्हेंबर रोजी अकोला आणि चिमूर येथे ते सभा घेणार आहेत. याआधी राहुल यांनी नागपूर, मुंबई आणि गोंदिया येथे प्रचारसभा घेतल्या आहेत.

झारखंड, प. बंगालमध्ये ईडीचे १७ ठिकाणी छापे

रांची : बांगलादेशी नागरिकांच्या कथित बेकायदेशीर घुसखोरी प्रकरणाशी संबंधित मनी लॉंड्रिंग (पीएमएलए)च्या प्रकरणात झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये अनेक ठिकाणी ईडी (सक्तवसुली संचालनालय)ने छापे टाकले. झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यातील मतदानाच्या एक दिवस आधीच केंद्रीय संस्थेच्या रांची कार्यालयाद्वारे दोन्ही शेजारील राज्यांत एकूण १७ ठिकाणी छापे टाकले. विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ४३ मतदारसंघात बुधवारी तर दुसऱ्या टप्प्यात २० नोव्हेंबर रोजी ३८ मतदारसंघात मतदान होणार आहे. दरम्यान, या छापेमारीवरून राज्यातील सत्ताधारी झामुमो आणि काँग्रेसने भाजपवर सडकून टीका केली आहे.

रांचीतील बरियातू मार्गावरील एक हॉटेल आणि शहरातील एका रिसॉर्टची ईडीच्या अधिकाऱ्यांनी झाडाझडती घेतली. या कारवाईवेळी सीआरपीएफचे पथकही उपस्थित होते.

झारखंडमध्ये ४३ जागांसाठी आज मतदान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

रांची/सरायकेला : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यातील निवडणूक प्रचार सोमवारी समाप्त झाला. येथे पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबरला ४३ जागांसाठी तर उर्वरित ३८ जागांसाठी दुसऱ्या टप्प्यात २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. 'इंडिया' आणि रालोआ (राष्ट्रीय लोकशाही आघाडी) अशा दोन्ही आघाड्यांमध्ये अत्यंत चुरशीची लढत होत आहे. भाजपने केलेल्या जोरदार टीकेला काँग्रेसचे प्रत्युत्तर, आरोपांच्या फैरी आदींनी निवडणूक प्रचाराचा पहिला टप्पा गाजला.

दरम्यान, 'झारखंडमध्ये आदिवासींची लोकसंख्या झपाट्याने घटत आहे. येथे भाजपचे सरकार आल्यास घुसखोरांची आळख पटवून त्यांना हुसकावून लावण्यासाठी एक समिती स्थापन केली जाईल तसेच त्यांनी बळकावलेल्या जमिनीवर पुन्हा दावा केला जाईल, आदिवासी महिलांशी विवाह करणाऱ्या घुसखोरांना जमिनीचे हस्तांतरण रोखण्यासाठी कायदा आणला जाईल,

अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी केली.

झारखंडच्या सरायकेला येथील प्रचार सभेला संबोधित करताना शहा यांनी राज्य सरकारवर टीका केली. झारखंडमध्ये बांगलादेशी घुसखोरांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोपही शहा यांनी झारखंड मुक्ती मोर्चाच्या (जेएमएम) नेतृत्वाखालील सरकारवर केला.

झारखंडमध्ये भाजपचा प्रचार केवळ सांप्रदायिक ध्रुवीकरणावर केंद्रित आहे. १० वर्षांच्या सत्तेनंतरही भाजप केवळ धार्मिक ध्रुवीकरणावर मते मागत असल्याचा आरोप काँग्रेसने सोमवारी केला. येत्या १३ आणि २० नोव्हेंबर रोजी झारखंडमधील जनता सातत्य, जातीय सलोखा आणि आत्मसन्मानासाठी निर्णायकपणे मतदान करतील, असा विश्वास काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी व्यक्त केला. झारखंडमधील 'इंडिया' आघाडीचा प्रचार गेल्या पाच वर्षांतील सरकारच्या कामगिरीवर आहे, आम्ही सर्वसमावेशक आणि समृद्ध झारखंडसाठी आमची दृष्टी आदींवर लक्ष केंद्रित करत आहोत', असेही रमेश म्हणाले.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ला चढवताना त्यांच्यावर विरोधकांवर दडपशाही करण्याचा, निवडून आलेली सरकारे पाडण्याचा आणि आमदारांची खरेदी केल्याचा आरोप केला. अदानी आणि अंबानी यांच्याबरोबर केंद्र सरकार चालत असल्याचा आरोपही त्यांनी मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यावर केला. मोदी आणि शहा यांनी ईडी, सीबीआय आणि इतर केंद्रीय संस्थांचा विरोधी नेत्यांविरोधात वापर केला. पण आम्ही घाबरत नाही. आम्ही स्वातंत्र्यासाठी लढलो आणि प्राणांची आहुतीही दिली, असा दावा खरगे यांनी केला.

राज्यात तीन दिवस हलक्या सरी पडण्याची शक्यता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : आंध्र प्रदेश, तमिळनाडूच्या किनारपट्टीवर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. त्यामुळे दक्षिण मध्य महाराष्ट्र, आणि दक्षिण कोकणात ढगाळ वातावरण निर्माण होऊन गुरुवारपासून पुढे तीन दिवस हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडूच्या किनारपट्टीवर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. त्यामुळे आंध्र प्रदेश, तमिळनाडू किनारपट्टीवर मुसळधार पावसाचा अंदाज आहे. समुद्रावरून आलेले बाष्प दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात येऊन ढगाळ वातावरण निर्माण होणार आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि पुणे जिल्ह्यांत मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाचा अंदाज आहे. गुरुवारपासून पुढील तीन दिवस पावसाची शक्यता आहे. तसेच ढगाळ हवामानामुळे काही प्रमाणात पडलेली थंडी कमी होणार आहे.

राज्यात मंगळवारी नगर आणि नाशिक जिल्ह्यात सर्वात कमी १३.७ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. पुण्यात पारा १५ अंशांवर, महाबळेश्वरमध्ये १४ आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये १५.८, मुंबईत २३.६ आणि सांताक्रुजमध्ये २१.४ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. कमाल तापमान किनारपट्टीवर सरासरी ३५ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्रात सरासरी ३३ अंश सेल्सिअस, मराठवाड्यात सरासरी ३१ आणि विदर्भात सरासरी ३२ अंश सेल्सिअस राहिले. मध्य आशियातून भारताच्या दिशेने येणारा एक पश्चिमी विक्षोप (थंड हवेचे झोत) सध्या पाकिस्तानला लागून असलेल्या राजस्थान, पंजाब परिसरात सक्रीय आहे. त्यामुळे पंजाब, हरियाणासह दिल्ली परिसरात दाट धुके पडत आहे. पंजाबच्या काही भागात मंगळवारी सकाळी दृष्यमानता शून्य मीटरपर्यंत खाली आली होती. गुरुवारपासून (१४ नोव्हेंबर) आणखी एक पश्चिमी विक्षोप हिमालयात सक्रीय होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे उत्तर भारतातील किमान तापमानात घट होऊन थंडीमध्ये काही प्रमाणात वाढ होण्याचा अंदाज आहे.

महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या, राज्यात स्थिर सरकार स्थापन होईल

पंतप्रधान मोदींचा महाविकास आघाडीवर घणाघात

गाडीला ना चाक आहेत ना ब्रेक; गाडी कोण चालवणार, यावरुन मविआत मारामारी सुरू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/चंद्रपूर : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. या निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे अवघ्या देशाचं लक्ष लागलेलं आहे. सध्या महाविकास आघाडी आणि महायुतीसह इतर सर्वच पक्षांचा जोरदार प्रचार सुरु आहे. महाराष्ट्रात प्रचारासाठी दिल्लीतील दिग्गज नेते देखील विविध मतदारसंघात सभा घेत आहेत. या सभांच्या माध्यमातून आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज चंद्रपूरच्या चिमुरमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत पंतप्रधान मोदी यांनी महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल करत महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचं सरकार येणार असल्याचा दावा केला. तसेच कलम ३७० बद्दल भाष्य करत जनतेने आशीर्वाद दिल्यामुळे ३७० कलम कायमचं जमिनीत गाडलं, असंही म्हणाले. तसेच महाविकास आघाडी म्हणजे भ्रष्टाचाराची खिलाडी आहे, अशी खोचक टीका पंतप्रधान मोदी यांनी केली.

भाजपा महायुती आहे तर राज्याची प्रगती आहे. हे महाराष्ट्रातील जनतेला देखील माहिती आहे. या निवडणुकीनंतरही राज्यात भाजपा महायुतीचं सरकार स्थापन होईल असा विश्वास आहे. आज महाराष्ट्र भाजपाला मी शुभेच्छा देतो. कारण एवढ्या चांगल्या पद्धतीने जाहीरनामा प्रसिद्ध केला. यामध्ये लाडक्या बहिणींसाठी, युवकांसाठी आणि विकासासाठी एकापेक्षा एक असे अनेक चांगले संकल्प करण्यात आले आहेत. महाराष्ट्रात डबल इंजिनचं

सरकार म्हणजे दुप्पट वेगाने विकास. आज महाराष्ट्र असं राज्य आहे की त्या राज्यात सर्वात जास्त विदेशी गुंतवणूक येत आहे. महाराष्ट्रात अनेक विमानतळं निर्माण होत आहेत. महाराष्ट्रात जवळपास १२ वंदे भारत ट्रेन सुरु आहेत, असं म्हणत पंतप्रधान मोदींनी विरोधकांवर हल्लाबोल केला.

सोलापूर जिल्ह्यात अकरा विधानसभा मतदारसंघ आहेत. महायुतीच्यावतीने अकरा उमेदवार नशीब आजमावत आहेत. महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोलापूर शहरातील होम मैदान येथे सभा झाली. सभेत बोलताना मोदी यांनी महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेस पक्षाने देशात साठ वर्षे राज्य केले. पण, त्यांची विचारसरणी ही समस्या निर्माण करायच्या आणि लोकांना त्या समस्यांमध्ये अडकवून ठेवणे असे काँग्रेस पक्षाचे धोरण राहिलेले आहे. महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या, राज्यात स्थिर सरकार स्थापन होईल, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्र राज्याला स्थिर सरकारची गरज आहे. पुढील पाच वर्षांसाठी स्थिर सरकार पाहिजे असेल तर महायुतीसोबत राहा. महायुती सरकार दूरगामी धोरण आखणार आहे.

महाविकास आघाडीवाले ज्या गाडीतून पुढे जात आहेत, त्या गाडीला ना चाक आहेत ना ब्रेक आहे. महाविकास आघाडीची गाडी कोण चालवणार, यावरुन त्यांच्यात मारामारी सुरू आहे. महाविकास आघाडीची गाडी सर्वांत अस्थिर गाडी आहे. हे लोक आपापसांत भांडण्यातच सर्वाधिक वेळ घालवत आहेत, असा आरोपही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

दरम्यान महाविकास आघाडीच्या काळात राज्यातील अनेक प्रकल्प बंद पडले. महाविकास आघाडीने कधीही विकासाची कामे होऊ दिले नाही.

आघाडीच्या नेत्यांनी फक्त कामं बंद पाडण्याचे प्रयत्न केले. खरं तर विकासाचे कामे बंद पाडण्यात विरोधी काँग्रेसची पीएचडी झाली आहे. महाराष्ट्रातील वाढवण बंदर आणि समृद्धी महामार्गासह अनेक मोठमोठ्या प्रकल्पांना रोखण्याचं काम आघाडीने केलं हे लक्षात ठेवा. महाविकास आघाडी म्हणजे भ्रष्टाचाराचे सर्वात मोठे खिलाडी आहेत. अशा महाविकास आघाडीला दुसऱ्यांदा लूट करण्यासाठी संधी देऊ नका, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

आता जम्मू कश्मीरमध्ये काय झालं? हे तुम्ही देखील पाहिलं. अनेक वर्ष दहशतवादाच्या घटना घडत होत्या. यामध्ये अनेक जवान शहीद झाले. मात्र, जम्मू कश्मीरमध्ये कलम ३७० रद्द करण्याला काँग्रेसचा विरोध होता. पण आम्ही कलम ३७० रद्द करण्याचं काम केलं.

जवळपास सात दशकं या देशात दोन संविधान होते. ते म्हणजे एक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं संविधान. या संविधानाचं आपण सर्वजण पालन करतो. तसेच दुसरं म्हणजे जम्मू काश्मीरमध्ये होतं. जम्मू काश्मीरमध्ये उच्च न्यायालयाचे न्यायाधिश आणि जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री हे आपल्या संविधानानुसार पदाची शपथ घेत नव्हते. त्याचं कारण ३७० कलमाची अडचण होती. मात्र, तुम्ही सर्वांनी आशीर्वाद दिला आणि ३७० कलम कायमचं जमिनीत गाडलं, असं म्हणत पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला.

संपादकीय....

उपाययोजनांची गरज

रिझर्व्ह बँकेच्या अनेक प्रयत्नांनंतरही देशात महागाई सातत्याने वाढते आहे. ऑक्टोबर महिन्यात घाऊक महागाई दर ६.२१ टक्क्यांवर पोहोचला आहे. गेल्या महिन्यात हा दर ५.५ टक्के होता. मात्र, या महिन्यात महागाईने मागच्या १४ महिन्यातील उच्चांक गाठला आहे. यामुळे खाद्यपदार्थ, विशेषत: भाज्या आणि उत्पादित खाद्य वस्तूंच्या किमतीही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. ज्याचा फटका आता सर्वसामान्यांना बसण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार, उत्पादित खाद्य वस्तूंचा महागाई दर ९.६९ टक्क्यांवर पोहोचला आहे, जो सप्टेंबर महिन्यात ८.३६ नोंदवला गेला. तर भाज्यांचा महागाई दर ४२.१८ टक्क्यांवर वर पोहोचला आहे. हा दर सप्टेंबर महिन्यात ३५.९९ टक्के नोंदवण्यात आला. याशिवाय फळांचा महागाई दरही वाढला आहे. जो सप्टेंबर महिन्यातील ७.६५ टक्क्यांहून ८.४३ टक्क्यांवर पोहोचला आहे. याशिवाय कडधान्यांच्या महागाई दरातही किंचीत वाढ बघायला मिळाली आहे. सप्टेंबर महिन्यातील ६.८४ टक्क्यांच्या तुलनेत ऑक्टोबर महिन्यात हा दर ६.९४ टक्के नोंदवण्यात आला आहे. तसेच मास आणि माशांचा महागाई दरातही २.६६ टक्क्यांवरून ३.१७ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. खाद्यतेलाच्या किंमतीही वाढल्या आहेत. महत्त्वाच्या म्हणजे घरांच्या महागाईचा दरही सप्टेंबरमधील २.७८ टक्क्यांवरून ऑक्टोबरमध्ये २.८१ टक्क्यांवर पोहोचला आहे. भाजीपाला आणि खाद्य तेलाच्या दरांत मोठी वाढ होणं हा चिंतेचा विषय आहे. देशाच्या काही भागात अवकाळी पावसामुळे नुकसान झालं आहे. त्यामुळे भाजीपाल्यांचे भाव वाढले आहेत. याशिवाय आयात शुल्कात वाढ झाल्याने खाद्यतेलाच्या किमतीही वाढल्या आहेत. या किंमती सरकारने स्थिर ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे अशी प्रतिक्रिया अर्थतज्ज्ञ रजनी सिन्हा यांनी दिली. महत्त्वाचे म्हणजे दीड वर्षांत महागाईचा दराने विक्रमी उच्चांक गाठल्याने डिसेंबरमध्ये होणाऱ्या चलनविषयक धोरणांच्या बैठकीत (एमपीसी) रेपो दर जैसे थे राहील अशी अपेक्षा व्यक्त केली जाते आहे. गेल्या काही बैठकांपासून रेपो दर ६.५ टक्क्यांवर कायम आहे. अशातच आता डिसेंबरमध्ये होणाऱ्या बैठकीत यात कोणता बदल सगळ्याचे लक्ष लागले आहे.

पक्षांचा लळा, पर्यावरणवादी डॉ. सलीम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सलीम अलींचा १२ नोव्हेंबर हा जन्मदिवस पक्षी दिन म्हणून जाहीर करण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरवले होते. डॉ. सलीम अली हे भारतातील आद्य पक्षीशास्त्रज्ञ आणि पर्यावरणवादी होते. सलीम अली यांनी भारतातील ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतातील पक्ष्यांचा आढळ, त्यांच्या सवयी, पक्ष्यांच्या विविध जाती आणि जातींमधील वैविध्य यांचा बारकाईने अभ्यास केला. त्यांच्या ह्या कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा चालू झाली. भारतातील हे पक्षी निरीक्षक सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांना 'बर्डमॅन ऑफ इंडिया' असे ही संबोधले जाते.

डॉ. सलीम अली आपण पक्षी निरीक्षणाकडे कसे वळलो याचे वर्णन आपल्या आत्मचरित्रात करतात. मुंबईच्या खेतवाडीमध्ये मुस्लिम कुटुंबात अली यांचा जन्म झाला. लहानपणी भेटवस्तू म्हणून दिलेल्या छर्र्याच्या बंदुकीने लहान पक्षी टिपायचे हा त्यांचा छंद होता. एके दिवशी टिपलेल्या चिमण्यांमध्ये त्यांना वेगळी चिमणी मिळाली. हिच्या गळ्यापाशी पिवळा ठिपका होता. नेहेमीपेक्षा हा पक्षी वेगळा दिसल्याने त्यांची उत्सुकता चाळवली व त्यांनी त्यांच्या मामांकडे हा पक्षी कोणता याची विचारणा केली. मामा त्याला थट बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या संचालकांकडे घेऊन गेले. तेथे संचालकांनी छोट्या अलीला हा पक्षी कोणता हे सविस्तर सांगितले, तसेच भुसा भरलेल्या पक्ष्यांचा संग्रह दाखवला. भारावललेल्या सलीम अलींना पक्ष्यांची जी भुरळ पडली ती कायमचीच.

यानंतरच्या काळात सलीम अलींचा पक्षीछंद त्यांना टिपणे व नोंदी करणे यांपुरता मर्यादित राहिला. शालेय शिक्षणानंतर त्यांना प्राणी शास्त्रात पदवी घ्यायची होती परंतु शास्त्रातील अनेक अवघड विषयांमुळे माघार घ्यावी लागली. दरम्यान ते ब्रम्हदेशातील आपल्या बंधूंच्या धंद्याला मदत म्हणून रंगूनला गेले. तेथे धंद्यात मदतीसोबत त्यांनी ब्रम्हदेशातील जंगले फिरून पक्ष्यांना टिपून त्यांच्या नोंदी ठेवायचा छंद चालू ठेवला. १९१८ मध्ये त्यांचा तेहमिना यांच्यांशी विवाह झाला. एका यशस्वी पुरुषामागे पत्नीचा हात असतो ही म्हण सलीम अलींच्या बाबतीत तंतोतंत लागू होते. १९२४ मध्ये रंगून मधील धंद्यात अपयश आल्यानंतर अली भारतात परत आले. दरम्यान तेहमिना यांनी सलीम अलींचा पक्ष्यांबद्दलचा कल जाणून घेतला होता व ज्यात त्यांचा छंद जोपासला जाईल अशी नोकरी करण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. परंतु सलीम अलींचे शिक्षण अशी नोकरी मिळवण्यास एकदम जुजबी होते. जवळच्या ओळखीने त्यांना बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी मध्ये गाईड लेक्चररची नोकरी मिळाली, परंतु अलींना ते पुरेसे नव्हते. त्यावेळेस भारतात पक्षीशास्त्र हा विषय अस्तित्वातच नव्हता. यासाठी त्यांनी जर्मनीमध्ये जाऊन पक्षीशास्त्राचे प्रशिक्षण घेतले व काही काळ इंग्लंडमध्ये काम केले.

भारतात आल्यानंतर या विषयात नोकरी मिळणे कठीण काम होते. सलीम अली अजूनही हौशी पक्षी निरीक्षकांसारखेच गणले जात. आर्थिक परिस्थिती खालावल्याने त्यांनी आपल्या पत्नीच्या मदतीने अलिबागजवळ किहीमजवळ आपला मुक्काम हलवला. या मुक्कामात त्यांनी सुगरण पक्ष्याच्या वर्तनावर अतिशय बारकाईने अभ्यास केला व त्यावर 'बीएनएचएस'च्या जर्नलमध्ये त्यांनी प्रदीर्घ शोधनिबंध लिहिला. हा निंबध त्यांना पक्षीशास्त्रज्ञ म्हणून नावलौकिक मिळवून देण्यास

– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

जबाबदार ठरला. त्यांनी पक्ष्यांना केवळ टिपून त्यात भुसा भरून संग्रहालयात ठेवण्यासाठी पक्षिशास्त्र नाही हे जगाला दाखवून दिले व एकूणच पक्षीशास्त्रालाच वेगळी दिशा दिली.

यानंतर १९३० च्या सुरुवातीला सलीम अलींना ब्रिटिश सरकारपुरस्कृत तसेच संस्थाने पुरस्कृत पक्षी मोहिमांवर बोलवणे येऊ लागली. अलींनी या मोहिमांवर आपण नोंदी तसेच पक्ष्यांचा जीवनशैलींवर अभ्यास करणार असल्याचे स्पष्ट केले, केवळ पक्षी टिपून नोंदी ठेवण्यात आपल्याला रस नाही, ते काम कोणीही स्थानिक कामगार करू शकेल असे स्पष्ट केले. आता सलीम अली सर्वमान्य पक्षी शास्त्रज्ञ झाल्यामुळे तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मंजूरी दिली व सलीम अलींचे पक्ष्यांचे खरेखुरे काम सुरू झाले. या नंतरच्या काळात भारताच्या मोठ्या भूभागावर त्यांनी पक्षी निरीक्षण मोहिमा आखल्या. देशाच्या वायव्य सरहद्दीपासून ते केरळच्या जंगलांपर्यंत तसेच कच्छच्या दलदलीपासून पूर्वेकडे सिक्कीम व अरुणाचलपर्यंत जाऊन त्यांनी पक्ष्यांच्या नोंदी केल्या. पक्ष्यांचे वर्तन, त्याच्यांत हवामानानुसार होणारे बदल, स्थलांतराच्या सवयी, विणीचे हंगाम यावर मोठ्या प्रमाणावर माहिती गोळा केली. सुरुवातीला या कामी त्यांची पत्नी तेहमिनाने खूप मदत केली. त्याच सलीम अलींच्या मोहिमांचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट बघत. १९३९ मध्ये तेहमिनांचा मृत्यू झाल्यानंतर अली खूपच व्यथित झाले. त्यांच्या आयुष्यात खूप मोठी पोकळी निर्माण झाली. परंतु त्यातून सावरून पुन्हा लग्न न करता त्यांनी आपले आयुष्य पूर्णपणे पक्ष्यांना वाहून देण्याचे ठरवले. आपला मुक्काम मुंबईला बहिणीच्या घरी हलवला व तेथूनच आपले उर्वरित आयुष्य घालवून भारतीय पक्षीशास्त्रासाठी अजरामर ठेवा निर्माण केला.

सलीम अलींचे पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मोठेपण कशात आहे तर त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके. भारतभर फिरून त्यांनी जी तपशीलवार माहिती गोळा केली होती, त्याचे त्यांनी केवळ रेकॉर्ड्समध्ये स्थान न ठेवता ती माहिती सर्वसामान्यांना वापरता येईल अश्या शैलीत पुस्तके लिहिली. सुरुवातीच्या काळात त्यांचे लिखाण सुधारण्यातही त्यांना तेहमिनांनी मदत केली होती. १९४३ मध्ये लिहिलेले द बुक ऑफ इंडियन बर्ड्स हे पुस्तक आजही पक्षी ओळखण्यासाठी पहिल्या पसंतीचे आहे आज हे पुस्तक १३ व्या आवृतीत असून पुस्तकातील पक्ष्यांची फारच थोडी चित्रे बदलण्यात आली आहेत. यावरून त्यांनी केलेल्या सूक्ष्म निरीक्षणांची अचूकता लक्षात येते. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ बर्ड्स ऑफ इंडिया अँड पाकिस्तान (पिक्टोरियल गाईड) या दहा खंडी पुस्तकाने त्यांना खऱ्या अर्थाने अजरामर केले. डॉ. सिडने डिलन रिप्ली यांच्या साथीदारीत त्यांनी अपार परिश्रम घेऊन भारतीय पक्ष्यांच्या १२०० जातींच्या व २१०० उपजातींच्या नोंदी, त्यांच्या सवयी वगैरे सर्वांगीण शास्त्रशुद्ध माहिती चित्रांसहित एकाच ठिकाणी उपलब्ध केली.

१९५० व ६० च्या दशकात जेव्हा भारतात पर्यावरण हा शब्द अस्तित्वातच नव्हता त्यावेळेस भरतपूरच्या केवलदेव घाना राष्ट्रीय उद्यान तसेच केरळमधील सायलंट व्हॅली राष्ट्रीय उद्यानात तत्कालिन होणारे पर्यावरणास हानीकारक प्रकल्पांना विरोध दर्शावला. त्यांचे वाक्य तत्कालीन पंतप्रधान चरणसिंग यांना चांगलेच झोंबले होते. ताजमहाल नष्ट झाला तर पुन्हा बांधता येईल परंतु सायलंट व्हली सारखे जंगल एकदा नष्ट झाल्यावर पुन्हा उभारता येणार नाही. त्यांनी केलेल्या शास्त्रीय वादावर सरकारने नमते घेउन इंदिरा गांधी सरकारने हे प्रकल्प स्थगित केले तसेच अंततः त्यांना राष्ट्रीय उद्यानांचा दर्जा देउन कायमचे संरक्षित केले. तसेच अनेक दुर्मिळ प्राणी व पक्षी यांबाबत आपल्या पुस्तकांद्वारे, संस्थेद्वारे, शिष्यांमार्फत केलेले सरकार तसेच सामान्य नागरिकांमध्ये केलेले प्रबोधन भारतातील पर्यावरण चळवळीचा पाया ठरले. त्यामुळेच भारतातील आद्य पर्यावरणवाद्यांमध्ये डॉ. सलीम अली यांचा समावेश होतो. आज त्यांच्या जन्मदिनानिमित्त सर्वांना राष्ट्रीय पक्षी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

नाट्य रंगभूमी चळवळीची सौंदर्य सृष्टी महानच....! नाट्य परंपरा गतिमान : इतिहास साक्षी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

झाडीपट्टी रंगभूमीला संशोधकांच्या अभ्यासावरून यंदा १३८ वर्षे पूर्ण झाली आहेत. पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारासह नागपूर या जिल्ह्यांचा भाग हा 'झाडीपट्टी' म्हणून ओळखला जातो. लोककला, डाहाका, खडीगंमत, भारूड, कथासार गोंधळ, रामायणी पोवाडे, दंडार अशी विविध नावांनी ओळखले जाई. त्यांचे आयोजन सण, उत्सव, जत्रा या निमित्ताने होई; कधी हौशीनेही केले जाई. त्यात दंडार हे लोकनाट्य महत्त्वाचे. दंडारीच्या निमित्ताने रात्री दहा वाजता सुरू झालेली करमणूक पहाटेपर्यंत चालत असे. दंडारीतील पात्रांना आणि कथानकाला घेऊन, त्याला विनोदाची झालर चढवत प्रेक्षकांचे मनोरंजन करत असे. दंडार मंडळे श्रीमंत पाटलांची असत. ती नेपथ्य, वेषभूषा, आभूषण याशिवाय बराच लवाजमा असलेली, सुसज्ज अशी असत. नानाजी जोशी आणि भाऊजी जोशी ही दंडार मंडळातील हौशी नटमंडळी



नवरगावला वास्तव्याला होती. त्यांना त्यांच्या आयुष्यात १८८६ मध्ये वेगळेच काहीतरी पाहण्याचा प्रसंग आला आणि झाडीपट्टी रंगभूमीचा इतिहास घडला असे म्हणतात. म्हणून झाडीपट्टी नाट्य रंगभूमी चळवळीची सौंदर्य सृष्टी महानच....!

सांगलीकर मंडळींचे 'संगीत सौभद्र' हे नाटक १८८६ मध्ये नागपूरला झालेले होते. त्याचे प्रयोग पंधरावीस दिवस सातत्याने तेथे होत राहिले. जोशी बंधू कामानिमित्त त्याचवेळी नागपूरला होते. त्यांनी 'चला, बघून तर घेऊ' असे म्हणत नाटक बघितले. त्यांना त्या नाटकातील संगीत आणि नेपथ्य बघितल्यावर 'हे सगळे तर आपल्याकडेही आहे' असे वाटले. त्यांनी नवरगावच्या दंडार मंडळातील लोकांनी ते बघायला पाहिजे; या भावनेने, गावी परतून मंडळात चर्चा केली. बालाजी पाटील बोरकर यांचे वडील, जोशी बंधू आणि इतर आख्खे दंडारमंडळ नाटक बघण्यास नागपूरला दाखल झाले. सर्वांनाच अप्रूप वाटले. पण त्यांचा आत्मविश्वासही नाटक पाहून वाढला. त्यांच्या ध्यानी आले, की 'हे तर सगळं आपण करतोय तेच आहे, फक्त थोडे शिस्तबद्ध हवे'. म्हणून त्यांनी त्यांचे 'व्यंकटेश प्रासादिक नाट्यमंडळ' स्थापन केले. त्यांनी तीन महिने तालमी करून 'संगीत सौभद्र' नाटकाचा पहिला प्रयोग चंद्रपूर जिल्ह्यातील नवरगाव या गावात १६ जानेवारी १८८७ ला सादर केला. हा पुरावा आहे.

सदर परंपरा कायम आजही आहे.झाडीपट्टी रंगभूमीवर १९६५-७० च्या काळात तिकिटाची नाटके सादर करण्याचा प्रघात सुरू झाला. नाटकातील स्त्री भूमिका स्त्रियांनीच कराव्या असा रसिकांचा आग्रह वाढू लागला. तेव्हा नागपूर-पुणे-मुंबई येथील नाट्यअभिनेत्रींना पाचारण केले जाऊ लागले. डाकूजीवनावरील व तमाशाप्रधान नाटकांत (१९७५च्या सुमारास) नागपूरच्या नृत्यागनांनाच बोलवावे लागायचे. त्या नृत्यांगनांनी झाडीपट्टी रंगभूमीवर संगीताचा साज चढवला. तबल्याचा ठेका, नृत्यांगनांचा घुंगराचा आवाज आणि उडत्या चालीच्या लावण्या यांमुळे नाटकांची आवड वृध्दिंगत होऊन झाडीपट्टी रंगभूमीवर गर्दी वाढू लागली. झाडीपट्टीतील नृत्यांगना पुढे

– मुन्नाभाई नंदागवळी,
येरंडी-बाराभाटी, जि. गोंदिया.
मो. ९७६४६७६४९९
(कथाकार साहित्याचे अभ्यासक आहेत.)

येत व्यावसायिक नाटकांमधून त्यांच्या अभिनयाचा, नृत्याचा, गायनाचा साज चढवू लागल्या. झाडीपट्टीतील मुली पाचसात वर्षातच नाटकातून कामे करू लागल्या. यामुळे स्त्रिया-मुलींमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण होऊन संपूर्ण स्त्रीसंचात नाटक करण्याचा कल वाढू लागली. झाडीपट्टीतील नाटकामधील आरंभीच्या स्त्रीकलावंतः गीताचंद्र, शशिकला भाग्यवंत, भूमाला कुंभारे, ललिता पिंगळे झाडीपट्टीतील प्रसिद्ध नाटकेः प्रीती संगम, स्वर्गावर स्वारी, गोकुळचा चोर, हिरवा चुडा, वहिनीच्या बांगड्या, दिल्या घरी तू सुखी रहा, वनवास, दिवा जळू दे सारी रात आदी नाटकांचा उल्लेख आहे.

संशोधनाप्रमाणे रंगभूमीला १३८ वर्ष झाले, इतिहासाच याची नोंद आहे. नाटक विचारपूर्वक असावे, कथानक डोळसपणे असले पाहिजे. नकलीपेक्षा अकलीने असावे, तरच नाटक परंपरा जगल्यासारखी वाटेल.

प्रा. डॉ. श्याम मोहरकर, नाट्य समीक्षक व अभ्यासक, चंद्रपूर.

नाटकांच्या परंपरेत प्रायोगिक रंगभूमीचे फार महत्त्व आहे. नाविन्यपूर्ण प्रयोग हे प्रायोगिकमध्ये पाहायला मिळतात. यात नेपथ्य सूचक' आणि प्रतिकात्मक असते. संहिता आणि संहितेचा आशय मांडण्यावर अधिक भर दिलेला असतो; परंतु व्यावसायिक नाटकात या सगळ्याचा वापर आणि भर हा कलाकृती आकर्षक करण्यावर दिलेला असतो. संहिता आणि संहितेचा आशय याचा विचार व्यावसायिक दृष्टिकोनातून कलाकृती आकर्षक करण्यावर भर असतो. आर्थिक गणिते मात्र, सर्वस्वी संहिता कोणत्या प्रकारची आहे. विविध रुची संपन्न प्रेक्षक वर्ग आणि प्रेक्षकसंख्या नेहमीच कमी-जास्त होत असतात.

कार्तिकी यात्रा : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिक यात्रेचा मुख्य सोहळा मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी साजरा होत आहे. या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

सदरची फुलांची सजावट विठ्ठल भक्त राम जांभुळकर पुणे यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत करून दिली आहे. सजावट सेवेसाठी ३० प्रकारच्या विविधरंगी सुगंधी देशी विदेशी फुलांसह करण्यात आली आहे. यासाठी पांढरी शेवंती, भगवा झेंडु, पिवळा झेंडू, अष्टर, अशोकाची पाने, निशिगंधा, गुलाब, लिलीयम, परपल ार्कीड व्हाईट ऑर्कीड, ऑथोरियम, कार्नेशन, ब्लु डेजी, पिंक डेजी, तगर, चापा, कागडा, कमिनी, शेवंती, ार्कीड, गुलटॉप, गुलछडी, ब्लु टॅटस, व्हाईट टॅटस, जिप्सो, तुळशी, विड्याची पाने, कामीनी, कमळ ग्लॅडीओ इत्यादी प्रकारची फुले व पाने वापरुन संत नामदेव पायरी सह महाद्वार, विठ्ठल सभामंडप, सोळखांबी , चौखांबी, रुक्मिणी सभामंडप, परिवार देवता व व्हिआयपी गेट सह सेल्फी पॉईंट साकारण्यात आले आहेत. या सजावटीसाठी सुमारे कामगार सेवा करत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत द्यावी : स. कामगार आयुक्त सोलापूर सु.म.गायकवाड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/प्रतिनिधी) : सोलापूर जिल्हयातील विधानसभा मतदार संघ क्षेत्रात मतदानाचा हक्क बजावण्यासाठी योग्य संधी प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने या क्षेत्रात असलेल्या मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दि २४ ऑक्टोबर २०२४ रोजी च्या परीपत्रकानुसार मतदानाच्या दिवशी सुट्टी अथवा दोन तासाची सवलत हि उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने दुकाने इत्यादीना लागु राहील.

सोलापूर विधानसभा सार्वत्रीक निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर सोलापूर जिल्हयातील खाजगी कंपन्या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे नाटय गृहे व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इत्यादींना सुचना देण्यात येत आहे कि, दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाच्या दिवशी कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सार्वजनिक सुट्टी देण्यात यावी.

जर अपवादात्मक परिस्थितीत उत्पादन प्रक्रीयेतील कारखाना सुरु ठेवून मतदानासाठी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देण्याबाबत मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असून त्यांच्या परवानगीनेच दोन तासांची सवलत देता येईल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबधित अस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील. या कार्यालयामध्ये 'दक्षता-कक्ष' स्थापन करण्यात आला असून कामगारांच्या मतदाना विषयक काही तक्रारी असल्यास कार्यालयाच्या ०२१७-२७२८४०१ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन सहायक कामगार आयुक्त तथा नोडल अधिकारी लेबर वॉटर्स सोलापूर यांनी केले आहे.

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल सावंत यांची ताकद वाढली

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पाच माजी नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

विधानसभा मतदारसंघात मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पंढरपूर नगरपालिका पाच माजी नगरसेवक आणि प्रवेश केला आहे अमोल कोल्हे उमेदवार अनिल दादा सावंत ज्येष्ठ नेते वसंतराव देशमुख यावेळी प्रमुख उपस्थित होते.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभ चौरंगी निवडणुकीत मंगळवारी मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या पंढरपूर नगरपालिकेचे माजी नगरसेवक संतोष नेतराव, प्रताप भिंगेकर, अक्षय गंगेकर, सुरेश नेहतराव, बाळासाहेब नेहतराव,, यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे..

वसंत नाना देशमुख,, दीपक वाडेकर, सुभाष भोसले,, संदीप मांडवे श्याम गोगाव सर,, अनिता पवार,, आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते या पक्ष प्रवचमुळे पंढरपूर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांची ताकद वाढलेली आहे.

विधानसभा निवडणुकीत अनिल सावंत यांनी जोरदार आव्हान उभे केले आहे असून ती तीन दिवसांपूर्वी काँग्रेस शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी यांच्यासह विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला होता आता पाच माजी नगरसेवकांनी प्रवेशामुळे भाजप आणि काँग्रेसलाही मोठा धक्का बसला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

थोडक्यात...

मौलाना अबुल कलाम आझाद यांना जयंतीनिमित्त अभिवादन

सोलापूर : सोलापूर महानगरपालिकेच्या देशाचे पहिले शिक्षण मंत्री भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंती निमित्त कौन्सिल हॉल येथील आयुक्तांच्या कार्यालयात देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या प्रतिमेस उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महिला व बालकल्याण अधिकारी रोहित रामटेके, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, सचिन कांबळे, सिद्धू तिमिगार, अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

बागेश्वर धामचे पिठाधीश धीरेंद्र शास्त्री यांचे आज होम मैदानावर संतसंमेलन

सोलापूर : महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने बुधवार दि. १३ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता होम मैदानावर बागेश्वरधामचे पिठाधीश पंडीत धीरेंद्र कृष्ण शास्त्री महाराज यांचे संतसंमेलन आयोजित करण्यात आल्याची माहिती मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर आणि कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली. जगाचे कल्याण केवळ सनातन हिंदु धर्मच करू शकतो आणि संपूर्ण विश्वात कोणत्याही जाती धर्मात भेदभाव असू नये असे ते नेहमी आपल्या प्रवचनातून सांगत असतात. मुलींना शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे असे क्रांतीकारी विचारही त्यांनी मांडले आहे. त्यांना बागेश्वरधाम सरकार म्हणूनही संबोधले जाते. त्यांचे दर्शन सोलापूरकरांना व्हावे यासाठी श्री बागेश्वर धाम सेवा समिती महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. १३ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ७ यावेळेत संतसंमेलन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे बागेश्वर धाम सेवा समितीचे सोलापूर जिल्हा संयोजक अक्षय अंजिखाने आणि शहर संयोजक संजय साळुंखे यांनी सांगितले.

जनता दिल्लीच्या तख्तासमोर न झुकता महायुतीला धडा शिकवेल : खा. अमोल कोल्हे

महाराष्ट्र धर्म जपण्याची हि निवडणूक : खासदार अमोल कोल्हे; ४२ गावातील जनता मला कधीही परकं पाडणार नाही : अभिजीत पाटील

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर /प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे यांची जाहीर सभा करकंब येथे संपन्न झाली.

यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते साईनाथ अभंगराव, मा. जि.प.सदस्य भारत आबा शिंदे, संजय कोकाटे, संजय पाटील घाटणेकर, नितीन कापसे, शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, शिवसेना तालुकाध्यक्ष मधुकर देशमुख, काँग्रेसचे नितीन नागणे, ज्योती कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष सुवर्णा शिवपुरे, बाबूतात्या सुर्वे, विष्णू भाऊ बागल, सुधीर भोसले, विजय भगत, करकंबचे जेष्ठ दिलीप पुरवत बी.एस पाटील, अमोल शेळके, खरे गुरुजी यासह महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी आणि करकंब परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभिजीत पाटील यांच्या रूपाने शरद पवार साहेबांचा पट्ट्या आमदार होणार; खासदार अमोल कोल्हे यांनी व्यक्त केला विश्वास

यावेळी बोलताना खासदार अमोल कोल्हे म्हणाले की लोकसभेला फटका बसल्यानंतर महायुती सरकारने मतांवर डोळा ठेवून अनेक योजना काढल्या. मात्र शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने राज्यात दिवसाला आठ शेतकरी आत्महत्या करत आहेत. तर सत्ताधाऱ्यांकडून उद्योगपतींना कर्जमाफी दिली गेली. यामुळे सत्ताधाऱ्यांवर राज्यातील शेतकरी नाराज आहेत. सत्ता मिळवण्यासाठी भाजपाने पक्ष फोडाफोडीचे राजकारण केले. यामुळे विधानसभेची निवडणूक हि महाराष्ट्र धर्म जपण्याची निवडणूक झाली आहे. लोकसभा निवडणुकीला येथील जनता दिल्लीच्या तक्तासमोर झुकली नाही. त्यांना धडा शिकवला. याही निवडणुकीला जनता महायुतीला चांगलाच धडा शिकवेल असा हल्लाबोल खासदार कोल्हे यांनी यावेळी महायुती सरकारवर केला.

ते पुढे बोलताना म्हणाले की शरद पवार साहेबांनी शेतकऱ्यांचे सातबारे कोरे करण्याचे काम केले. त्याच पद्धतीने अभिजीत पाटील यांनी सहकारातून मोठे काम केले आहे. अभिजीत पाटील हे आमदार झाल्यावर शरद पवार यांचे या मतदारसंघावर विशेष लक्ष राहणार आहे. यामुळे शरद पवार यांचा पट्ट्या अभिजीत पाटील आमदार होणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी त्यांनी राज्यातील जनतेसाठी महाविकास आघाडीने काढलेल्या जाहीरनाम्याचे थोडक्यात माहिती दिली.

यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की मतदार संघात अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. मात्र विरोधक मुद्द्यावर बोलत नाहीत. रस्त्याची दुरावस्था झाली आहे. करकंब येथे अनेक संतांच्या पालख्या मुक्कामी असतात मात्र कोणतीही सोय होत नाही. कोट्यावधी खर्च करूनही येथील नागरिकांना पिण्याचे पाणी देऊ शकले नाहीत, बस स्थानकाची दुरावस्था झाली आहे. परिसरातील शेतकऱ्यांना शेतीला पाणी नाही. करकंब नगरपंचायत न झाल्याने कोणताही निधी येत नाही. या मतदारसंघावर पवार साहेबांचे विशेष लक्ष आहे. यांना गड राखायला दिला तर ते मालक झाले अशा शब्दात शिंदे यांचा समाचार घेतला.

ते पुढे बोलताना म्हणाले की विठ्ठल कारखान्याच्या वेळेस दिलेला शब्द मी पाळला आहे. पवार साहेबांचे हात बळकट करण्यासाठी मला एक वेळे संधी द्या. मी करकंब नगरपंचायत करेन, परिसरातील नागरिकांसाठी करकंबला अप्पर तहसील कार्यालय मंजूर करेन, भीमा नदीवर बंधाऱ्याची उंची वाढवून या भागातील शेतकऱ्यांच्या पाण्याचा कायमचा प्रश्न मिटवणार, मुस्लिम दफनभूमीचा प्रश्न मार्गी लागेल, घरकुलाचा प्रश्न मार्गी लावेन, ४२ गावातील ही जनता मला पोरक पाडणार नाही असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी त्यांनी कार्तिकी एकादशी निमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

कार्तिकी वारीत वारकऱ्यांची तहान भागवत आहेत स्वेरीचे विद्यार्थी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री.विठ्ठलाच्या भेटीसाठी आतूर झालेल्या वारकऱ्यांची तहान दरवर्षीप्रमाणे यंदाही स्वेरीचे विद्यार्थी भागवीत आहेत. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार व डिप्लोमाचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांच्या सहकार्याने डिप्लोमा इंजिनिअरिंगचे विद्यार्थी, विभागप्रमुख आणि प्राध्यापक वर्ग हे पाणी वाटप करत आहेत.

पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षिक एस.जे. सावंत व प्रमुख पाहुणे भीमाशंकर गुरुसिद्धाप्पा सारवाडकर यांच्या हस्ते व रांगेतील वारकरी सौ.संगीता राजू कोळी, मुक्ताई नगर, जळगाव व वारकरी प्रशांत देशमुख, रा.मासाळवाडी, जळगाव यांच्या उपस्थितीत पाणी वाटपाचे उदघाटन करण्यात आले. या पाणी वाटपाच्या उपक्रमात श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित असलेल्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी असे मिळून जवळपास ५० जण पाणी वाटप करत आहेत. राज्यात तंत्रशिक्षणातून विशेष ओळख निर्माण करणाऱ्या 'स्वेरी' या संस्थेमार्फत, संस्थेच्या स्थापनेपासून अर्थात १९९८ पासून विविध समाजोपयोगी उपक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. यंदाच्या कार्तिकी वारीतील वारकऱ्यांचा सहभाग पाहता वारकऱ्यांची गर्दी अधिक होत असल्याचे जाणवत आहे त्यामुळे परंपरेप्रमाणे दर्शन रांगेतील वारकऱ्यांना आर.ओ. फिल्टर्ड पिण्याचे पाणी वाटपाचे कार्य काल नवमी (रविवार, १० नोव्हेंबर) पासून सुरु झाले. वारकऱ्यांच्या उपस्थितीत रिद्धी सिद्धी गणपती मंदिरालगत असणाऱ्या पत्राशेड मधील दर्शन मंडप रांगेतील वारकऱ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी देण्याच्या कार्याला आज दशमीच्या दिवशी अधिक गती आली आहे. सकाळी ८.०० ते सायंकाळी ८.०० या वेळेत गोपाळपूर, रिध्दी-सिध्दी मंदिर व दर्शन बारी, पत्रा शेड या ठिकाणी डिप्लोमाचे विद्यार्थी वारकऱ्यांना प्रचंड उत्साहाने आर.ओ. फिल्टर्ड पाण्याचे वाटप करत आहेत. नवमी, दशमी व एकादशी या तीनही दिवशी विद्यार्थी ग्लास, वॉटर जग आणि वॉटर टँकद्वारे पाणी वारकऱ्यांपर्यंत पोहचवून वारकऱ्यांची तहान भागवत आहेत. स्वेरीकडून दररोज साधारण आठ ते दहा हजार लिटर पाण्याचे वाटप केले जात आहे. या उपक्रमाच्या उदघाटनावेळी पोलीस उपनिरीक्षिक एस.जे.सावंत म्हणाले की, 'स्वेरीचे विद्यार्थी हे अभ्यासक्रमात अग्रेसर आहेतच पण त्यांच्या हातून नेहमीच समाजसेवा उत्तम पद्धतीने घडत आहे' असे म्हणून स्वेरीच्या समाजकार्याचे कौतुक केले. या कार्यात प्रा. ए.एस.भातलवंडे, प्रा. पी.एस.वलटे, रा.से.योजनेचे प्रा. एन.ए.शिंदे, इतर प्राध्यापक वर्ग व राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी वारकऱ्यांना पाणी वाटपाचे कार्य मनोभावे करत आहेत. कॉलेजमधून इतर सहकारी पाणी आणून दर्शन रांगेजवळ असलेल्या टाक्यात साठवतात. त्यानंतर विद्यार्थी मोठ्या उत्साहाने वारकऱ्यांना पाणी वाटप करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रत्येक दिवशी जवळपास २० प्राध्यापक व जवळपास ५० विद्यार्थी दिवसभर मोफत शुद्ध पाणी वाटप करत आहेत.

स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या विकास कामांना प्रेरित होऊन उबाठा गटाच्या महिला पदाधिकाऱ्यांचे भाजपा पक्षात प्रवेश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/ प्रतिनीधी : आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या विकास कामांना प्रेरित होऊन उबाठा गटाच्या महिला पदाधिकाऱ्यांचे भाजपा पक्षात प्रवेश.

राज्यसभा खासदार श्री इरण्णा कडाडी हे विधानसभा निवडणुकी करता अक्कलकोट दौऱ्यावर असताना उबाठा सेनेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी भाजपात प्रवेश केला यामध्ये उबाठा सेनाचे महिला तालुका अध्यक्ष अनुराधा चंद्रमोहन शिवगुंडे, श्वेता डीग्गे, सुमन वेदपाटक, स्वरौजना शाली, रिहाना शेख उपस्थित होते.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष शिवशरण जोजन यांनी भाजपा महिला शहराध्यक्ष पदी विजया संजय गवंडी यांची नियुक्ती केली तसेच शहर सरचिटणीस पदी अनुराधा शिवगुंडे व उपाध्यक्ष श्वेता डीग्गे यांची नियुक्ती केली त्यावेळी विधानसभा प्रभारी चंदू पाटील, जिल्हा सरचिटणीस सौ सुरेखा होळीकट्टी, निवडणूक प्रमुख जयश्री बेटेगिरी, प्रभाकर मजगे, मिलन कल्याणशेट्टी, रमेश कापसे, कांतू धनशेट्टी, आनंद तानवडे, अतिष पवार, नागराज कुंभार, आंनद पवार, मलकाप्पा कोगनुर, अंकुश चौगुले, जिल्हासरचिटणीस आप्पासाहेब बिराजदार, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष नन्नू कोरबू, ज्येष्ठ नेते मल्लिनाथ स्वामी, लिंगराज मठपती, दयानंद बिडवे, राजकुमार झिंगाडे तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

आमची माती, आपली माणसं, आपला परिवार ग्रुपचा पाठिंबा!

इंदापूर तालुक्यात ६० गावात ग्रुपचे काम

हर्षवर्धन पाटील यांचे विषयी वाढतेय सहानभूती.... चक्क उमेदवारानेच दिला पाठिंबा!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

इंदापूर प्रतिनिधी/ अतुल सोनकांबळे : इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांचे विषयी जनतेमध्ये सहानुभूती वाढत असून, आपली नाती, आपली माणसं, आपला परिवार ग्रुपचे उमेदवार भीमराव जगन्नाथ शिंदे यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये हर्षवर्धन पाटील यांना ग्रुपच्या वतीने पाठिंबा जाहीर केला आहे. इंदापूर येथे आयोजित मेळाव्यामध्ये हर्षवर्धन पाटील यांचेकडे रविवारी (दि.१०) ग्रुपने पाठिंबाचे पत्र सुपूर्द केले.

हर्षवर्धन पाटील म्हणाले, ज्या समाजामध्ये आपण राहतो, त्या समाजाचे आपण काहीतरी देणं लागतो या सामाजिक जाणवेतून हा परिवार चांगले काम करीत आहे. या ग्रुपला आमचे कायम सहकार्य राहील, उपकाराची जाणीव ठेवणारे संस्कार आमचेवर आहेत. इंदापूर विधानसभा निवडणुकीत सक्रिय पाठिंबा दिलेबद्दल आमची माती, आपली माणसं, आपला परिवार ग्रुपचे हर्षवर्धन पाटील यांनी भाषणात आभार व्यक्त केले.

या मेळाव्यात ग्रुपचे संस्थापक महादेव लोंढे, उमेदवार भीमराव शिंदे, उपाध्यक्षा सुजाता घोगरे यांनी मनोगत व्यक्त करून हर्षवर्धन पाटील यांना पाठिंबा जाहीर केला. प्रास्ताविक ग्रुपचे सचिव नामदेव सोनवणे यांनी केले. यावेळी भाग्यश्री पाटील, अशोक घोगरे, अंकिता पाटील ठाकरे, स्वप्निल सावंत, परिवारचे तालुकाध्यक्ष जयवंत शिंदे, महिला तालुकाध्यक्ष चंद्रकला करे, प्रचारक व मार्गदर्शिका दमयंती जानकर तसेच छायाताई पडसळकर, काकासाहेब देवकर, जयश्री खबाले, विजय सिद, उज्वला गायकवाड, पूजा शिंदे व ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार भारत बनकर यांनी मानले.

इंदापूर तालुक्यामध्ये आपल्या सामाजिक व महिलांसाठीच्या कार्याने आपली नाती, आपली माणसं, आपला परीवार हा ग्रुप ६० पेक्षा अधिक गावांमध्ये कार्यरत आहे. ग्रुपची स्थापना महादेव लोंढे यांच्या नेतृत्वाखाली झाली आहे. त्यांनी संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य म्हणून काम पहिले आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा जाहीर पाठिंबा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा स्वाभिमानी शेतकरी संघटना पाठिंबा आज सकाळी भीमानगर येथे स्वाभिमानाची बैठक झाली, त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये ऊसाचा काटा व उच्चांकी दर देण्याचे तीन वर्षे झाली काम करत असलेले अभिजीत आबा पाटील यांना एकमुखी पाठींबा देण्याचा निर्णय झाला आहे.

यावेळी स्वाभिमानीचे नेते विठ्ठलचे संचालक सचिन पाटील, ज्येष्ठ नेते शिवाजी भाऊ पाटील, युवा नेते प्रशांत पाटील, अजिनाथ पराबत, प्रताप पिसाळ, सत्यवान गायकवाड, अतकर सर, विष्णु कुंभार, आबा कुंभार तसेच संजय बाबा कोकाटे, नितीन बापू कापसे, बाळासाहेब पाटील यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

थोडक्यात...

कॉ. नरसय्या आडम यांच्या घरावर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून दगडफेक

सोलापूर : बापूजी नगर येथे सोमवार रात्री आठ च्या सुमारास काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते कुरमेश बुगले विशाल बुगले, गणेश म्हेत्रे व अन्य कार्यकर्त्याकडून माजी आ. नरसय्या आडम घरात नसताना त्यांच्या घरावर दगडफेक केली त्यामुळे सभोवतालचे परिसर वातावरण खूप तंग झाले, अशी माहिती माकपचे कार्यकर्ते ड. अनिल वासम यांनी दिली.

माजी नगरसेविका कामिनी आडम यांनी याबाबत फोनवर कळविले असता अनिल वासम हे तात्काळ आडम यांच्या घराजवळ पोहोचले त्यावेळी येथे प्रचंड गोंधळ व बाचाबाची चालली होती. त्यावेळी यल्लप्पा भंडारी यांनी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना रोखण्याचा प्रयत्न केले मात्र ते आक्रमकपणे ठिकाणी गोंधळ करत होते. अनिल वासम यांनीही हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला.

त्यांनी ११२ क्रमांकावर पोलिसांकडे तक्रार नोंदवल्यानंतर पोलिसांचा ताफा तिथे आला. वासम यांनी आडम यांच्या घरावर का ?दगडफेक केली अशी विचारणा केली असता धक्काबुक्की झाली. त्यामुळे माकपचे कार्यकर्ते आणि काँग्रेसचे कार्यकर्ते यांच्यात तणाव वाढला. याबाबत तक्रारी नंतर सदर बाजार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे यांनी तात्काळ त्या ठिकाणी पोलिसांचा ताफा पाठवून वातावरण काबूत आणले. आडम यांनी याबाबत माझ्या जीवाला धोका असून उपद्रव करणाऱ्या लोकांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

कार्तिकी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न

राज्यातील सर्व जनतेला सुख समृध्दी लाभो

विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांचे श्री पांडूरंग चरणी साकडे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर (प्रतिनिधी) वारकरी भाविकांना तसेच राज्यातील सर्व जनतेला पांडुरंगाच्या कृपेने सुख, समृद्धी, लाभो त्यांच्या जीवनात ऐश्वर्य व भरभराट येवो असे साकडे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत फुलकुंडवार यांनी कार्तिकी एकादशीनिमित्त आयोजित शासकीय महापुजेच्याप्रसंगी श्री विठ्ठलाच्या चरणी घातले.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीची कार्तिकी एकादशीनिमित्त शासकीय महापूजा विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार व सौ. सायली पुलकुंडवर तसेच मानाचे वारकरी यांच्या हस्ते आज पार पडली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम,अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर,अतिरिक्त पोलीस अधिक्षक प्रीतम यावलकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार म्हणाले, सर्व भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशासनाने विविध कामे हाती घेतली आहेत. भाविकांच्या सेवेसाठी दर्शन मंडप स्काय वॉक, दर्शन रांग आदी विविध सुविधांची कामे प्रस्तावित केली आहेत. याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद सतत पाठपुरावा करीत आहेत. भविष्यात पंढरपूरात येणाऱ्या वारकरी भाविकांना अधिकच्या सुविधा उपलब्ध होतील. तसेच महाराष्ट्रात सद्यस्थितीत विधानसभेच्या निवडणुका सुरू आहेत ही निवडणुकीची प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडो जास्तीत जास्त संख्येने मतदार राजांनी भाग घेऊन देशाची लोकशाही बळकट होण्यासाठी सर्व भाविकांचा तसेच जनतेचा सहभाग लाभो असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

लातूर जिल्ह्यातील सगर दाम्पत्य ठरले मानाचे वारकरी

मानाचे वारकरी-

कार्तिकी एकादशी यात्रा २०२४ निमित्त मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते होणाऱ्या शासकीय महापूजेच्या वेळी उपस्थित राहणाऱ्या मानाच्या वारकरी निवडीसाठी दर्शन रांगेतून माळकरी भाविकांची निवड करण्यात आलेली आहे. लातूर जिल्ह्याच्या उदगीर तालुक्यातील श्री. बाबुराव बागसरी सगर व सौ. सागरबाई बाबुराव सगर या दांपत्याची मानाचे वारकरी म्हणून निवड करण्यात आलेली आहे.सगर दापत्य हे गवंडी काम करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. हे दाम्पत्य मागील १४ वर्षापासून नियमितपणे वारी करीत आहे. या दाम्पत्याला विभागीय आयुक्त डॉ पुलकुंडवार यांच्या हस्ते राज्य परिवहन महामंडळाचा वर्षभर मोफत एसटी पास देण्यात आला.

प्रारंभी मंदिर समितीच्या वतीने डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व त्यांच्या पत्नी सायली पुलकुंडवर व मानाचे वारकरी यांचा सत्कार करण्यात आला.

मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी प्रास्ताविकात सांगितले की, श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना केंद्रबिंदू मानून भाविकांना मंदिर समितीमार्फत पत्रा शेड, दर्शन रांग,दर्शन मंडप आदी ठिकाणी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. तसेच मंदिर समिती मार्फत मोफत अन्नदान करण्यात येत आहे. श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिसरातील परिवार देवतांच्या मंदिराच्या जिर्णोद्धाराच्या अनुषंगाने जतन व संवर्धन कामास सुरवात झाली असून, मंदिरास मुळ रूप येत आहे. याशिवाय, दर्शनरांगेत स्कायवॉक व दर्शनहॉल बांधकामास देखील लवकर सुरवात करून दर्शनरांगेतील भाविकांना कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच भाविकांसाठी येत्या आषाढी वारीपर्यंत टोकन दर्शन व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मंदिर समितीची व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी केले. तर सूत्रसंचालन विनया कुलकर्णी यांनी केले.

डाळिंब लागवडीला आबासाहेबांनी प्रोत्साहन दिले

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/ प्रतिनिधी : भाई गणपतराव देशमुख यांनी सांगोला तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्याची शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नातून या तालुक्यातील पाणी आले व तालुक्याचे नंदनवन झाले त्यांनी देशाचे ज्येष्ठ नेते शरदचंद्रजी पवार यांच्या मतीने सांगोला तालुक्यात विशेषता अजनाळे गावात डाळिंब लागवडीला प्रोत्साहन दिले व या भागात डाळिंबीच्या बघायचे मुळे मोठे अर्थकारण घडून आले आहे व या भागाचा विकास झाला आहे असे प्रतिपादन महाविकास आघाडी इंडिया अलायन्स शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी केले.

महाविकास आघाडी इंडिया अलायन्स शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ अजनाळे गावात सोमवारी रात्री जाहीर सभा झाली व त्यावेळी डॉक्टर बाबासाहेब देशमुख बोलत होते.

यावेळी अनिकेत देशमुख, डॉक्टर सुदर्शन घेरडे, विष्णू देशमुख, माजी सभापती संगम धांडोरे, शंकर सलगर, दत्तात्रय येल्पले, ज्येष्ठ नेते प्रल्हाद हेल्पली बाबासाहेब येलपले राजाराम येलपले माजी सभापती प्रदीप मिसाळ अनिल शेंडगे हनुमंत देशमुख दत्ता चव्हाण काँग्रेस नेते सुनील नागणे इर्शाद बागवान संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रदीप मिसाळ आदींची भाषणे झाली.

डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे अजनाळेत प्रतिपादन

तिप्पेहाळीत शहाजीबापू गटाला धक्का, कार्यकर्त्यांचा दिपकआबांच्या उपस्थित शिवसेनेत प्रवेश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर /प्रतिनिधी : शहाजीबापू गटातील अंतर्गत गटबाजीला कंटाळून तसेच पक्ष नेतृत्वाच्या मनमानी कारभाराला कंटाळून सांगोला तालुक्यातील तिप्पेहाळी येथील शहाजीबापू गटाच्या कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करून मशाल हाती घेतली. तिप्पेहाळीतील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने शहाजीबापू गटाला खिंडार पडले आहे.

विधानसभा निवडणुकांची घोषणा झाल्यापासून सांगोला तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापलं आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत दिपकआबा साळुंखे पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर सांगोला तालुक्यातील शेतकरी कामगार पक्ष आणि शहाजीबापू गटामध्ये मोठा राजकीय भूकंप झाला आहे. शेकापसह शहाजीबापू पाटील गटाला सोडचिट्ठी देत आतापर्यंत हजारो कार्यकर्त्यांनी दिपकआबांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रवेश करून मशाल हाती घेतली आहे.

तिप्पेहाळी ता.सांगोला येथील शिवाजी निवृत्ती नरळे, बापू केराप्पा नरळे, दादासो बापू नरळे, ब्रह्मदेव नारायण नरळे, श्रीमंत धोंडीराम नरळे, रावसाहेब निवृत्ती नरळे, गोरखनाथ पांडुरंग नरळे, बाळू पांडुरंग नरळे, विलास पांडुरंग नरळे या शहाजीबापू गटाच्या कार्यकर्त्यांनी दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करून शिवसेनेची मशाल हाती घेतली आहे. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी दिपकआबा साळुंखे पाटील यांना विक्रमी मताधिक्याने विजय करण्याची ग्वाही दिली. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संभाजीराजे शिंदे, उपजिल्हाप्रमुख सूर्यकांत घाडगे, शिवसेना तालुकाप्रमुख अरविंद पाटील, माजी नगरसेवक सतीश सावंत, युवा नेते सुरेश गवंड यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिक उपस्थित होते.

५० वर्षाची परंपरा कायम : हौशी कलाकारांची शतकबाजी

गावच्या इतिहासात अनेक क्षेत्रात मानाचा तुरा

येरंडी गावच्या रंगभूमी अभिनय मंचाचे सुवर्ण महोत्सव..!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी :

येरंडी हे गाव आधीपासूनच शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य तथा राजकीय क्षेत्रात अग्रगण्य मानला जातो. गावच्या इतिहासात अनेक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे. अशातच यावर्षी येरंडी या छोट्या गावात नाटकाची परंपरा १९७४-७५ पासून सुरू आहे. गावात नाट्य रंगभूमी म्हणून पावन असणारे सार्वजनिक अभिनय मंचाला यंदा तब्बल ५० पूर्ण होत आहे. हे वास्तववादी इतिहास साक्षी आहे. म्हणन येरंडी गावच्या रंगभूमी अभिनय मंचाचे सुवर्ण महोत्सव..! काळ साजरा होत आहे.

सदर गावात सन १९७४-७५ या साली पहिला नाटक 'घडली माला अश्रू फूलांची' सादरीकरण करण्यात आले होते. अशाप्रकारे परंपरा कायम आजतागायत सुरू आहे. नाटकाची परंपरा सुरू करण्यामागे गावातील संगीतकार, दिग्दर्शक म्हणून नाटक बसविण्याची कार्य

स्वर्गीय अमृतलाल पंधरे व मोतीराम बागडे यांनी केले आहे. यामध्ये स्त्री भूमिका मोतीराम नंदागवळी व देवराम खोब्रागडे या दोन हौशी कलाकारांनी येरंडी रंगभूमीचा अभिनयमंच गाजवला हे विशेष बाब आहे. नंतर पुढे रक्तात रंगली नाती, कर्तव्य, चक्रव्यूह, सौभद्र, प्रीतिसंगम, नव्या जगाचा आरसा, का गरिबाचे रक्त पिता, बाईने फाग्या दणकवला, बाई बाटली जिंदगी फाटली, बाईसाठी भाटो गोड तसेच क्रांती अशा ऐतिहासिक, प्रायोगिक, सामाजिक व लावणी प्रधान नाटकांनी इतिहास रचल्याचे समजते.

स्त्री कलावंतांनीही घडवला प्रयोग

सन १९९२ यावर्षी फक्त स्त्री भूमिका साकारलेली 'सोन्याची द्वारा' हे लोकप्रिय झाली होती. यामध्ये ममता बोरकर, प्रज्ञा दहिवले, चित्रा रामटेके, सुषमा पंधरे, शालू खोब्रागडे, पूर्णा सोनवणे, नलू खोब्रागडे, शीला तागडे, उत्तरा दहिवले व संध्या दहिवले या स्त्रीयांनी गावासह जिल्हात सहासात प्रयोग सादर केले आहेत.

नाट्य क्षेत्रातील हौशी कलाकार

या रंगमंचाने घडविलेले कलावंत गोपाल बोरकर, सुखदेव दहिवले, किसन बोरकर, वासुदेव तागडे, ऋषी सोनवाणे, सदाशिव इस्कापे, बाबुराव कोवे, प्रभूदास तागडे, गोपाल कुंभारे, बापूदास बोरकर, विठ्ठल तागडे, भोजराज कांबळे, लक्ष्मण बागडे, मनोहर बोरकर, भाविक रामटेके, गोपाल सोनवाणे, पितांबर वाघाडे, मुनेश्वर गेडाम, नाशिक गेडाम (नाट्य लेखक) , रत्नदीप दहिवले, हविन तागडे, संगम नंदागवळी (नाट्यलेखक) सुरेश खोब्रागडे, मिलन बोरकर, प्रकाश शेंडे, बालकदास बोरकर, यादोराव कोवे, मोरेश्वर बोरकर, बापूदास पुराम, राजेश नैताम, टिकेश्वर शिवणकर, उमेश राऊत, कैलाश इस्कापे, कमलेश ब्राम्हणकर, तेजराम सोनवाणे, दिपक कुंभरे, दिनेश नंदागवळी, दिलीप बोरकर (शब्दसुचक) दिलीप वाघाडे, श्यामराव सोनवाणे, दिपक शिवणकर, विनोद सोनवाणे आतापर्यंत शंभराहून कलावंत या अभिनय मंचानी घडविले आहेत.

आमच्या गावात नाटके सुरू असून यावर्षी ५० वर्ष होत आहेत, हा रंगभूमी, रंगमंचाचे स्वाभीमान आहे. आमचे गाव नाटकासाठी प्रसिद्ध आहे, हौशी कलावंत घडले तर काही झाडीपट्टी रंगभूमीच्या नाटकात काम करतात. हे फारच अलौकिक असून अभिमान वाटते.

– एम. आर. नंदागवळी (नाट्य माहिती विश्लेषक, येरंडी)

स्थापलेली नाट्य कला मंडळे

सदर गावात आतापर्यंत सतसंघ नाट्य कला मंडळ, फ्रेन्डस नाट्य कला मंडळ, युवा संघर्ष नाट्य कला मंडळ, संमिश्र परिवर्तन नाट्य कला मंडळ, तथागत नाट्य कला मंडळ व परिवर्तनशील सामाजिक, सांस्कृतिक कला मंडळ स्थापून नाटके सादर करत आहेत.

दुधनी भीमनगर विकासापासून वंचित; मतदानांवर बहिष्कार घालण्याचा विचार करावे : सैदप्पा झळकी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट(प्रतिनिधी) : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी ग्रामीण भीमनगर येथील नागरिक मूलभूत सुविदेपासून वंचित असल्याने येथील नागरिक प्रशासन व लोक परंतिनिधीवर नाराज असून आगामी विधानसभा मतदानावर बहिष्कार घालण्याचा स्थानिक सुशिक्षित युवकांनी बैठक घेऊन विचार करावे असे आव्हाहन रिपाइं(आठवले)सोलापूर जिल्हा अध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केली आहे.

आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना श्री झळकी म्हणाले की,भीमनगर येथे दिवाबत्ती,गटार आणी पिण्याचे पाणी सह ईतर सुविधेपासून अनेक दिवसा पासून वंचित असून संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत आहे.या समश्या बरोबर येथील सर्व नागरीक अत्यंत गरीब असून कोणालाही शेत जमिन नसून देखील बिपिन रेशन कार्ड नसून वारंवार तहसिल कार्यालयास संपर्क साधून ही उपयोग झाली नाही स्मशानभूमी व बुध्द विहार कामासाठी प्रयत्न करूनही उपयोग झाली नाही असा नाराजगी प्रशासन व लोकप्रतिनिधी वर श्री सैदप्पा झळकी यांनी व्यक्त केली आहे.

याप्रसंगी शाखाध्यक्ष संतोष जन्ना,शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,निंगप्पा निंबाळ सह ईतर उपस्थित होते.